# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीसी/२००३/५५५
दिनांक : 07

प्रति,
प्राचार्य,
अंजुमन हामी-ओ इस्लामचे
अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टक्नॉलॉजी,
मंगळवारी रोड,सदर नागपूर.

*विषय :- शैक्षणिक वर्ष २००२-२००३ पासून कॉम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत*

संदर्भ :- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. ७४०--८९-२३१(ई)/आरसी/९४,दि. १४/६/२००२
२. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक टिईएम-२००२(२०६/०२)/तांशि-१, दिनांक २९/७/२००२

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेल्या मंजूरीस अनुसरुन शासनाने संदर्भाधीन दिनांक २९/६/२००२ च्या शासन निर्णयान्वये काही अटी व शर्तीवर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजूरी दिलेली आहे. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे आपल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात खालील नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यांत परवानगी देण्यांत येत आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | वाढीव प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | कॉम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग | ६० |

सदर नवीन अभ्यासक्रमासाठी आपण रु. ५०/- च्या स्टँपपेपरवर नोंदणीकृत हमीपत्र तीन प्रतीत या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच संचालक,तंत्रशिक्षण व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात रु. ३.०० लाख स्टेट बँक ऑफ इंडिया, नागपूर येथे जमा केलेले असल्यामुळे आपल्या अभियांत्रिकी ANJUMAN महाविद्यालयातील नवीन १ अभ्यासक्रमाच्या वरीलप्रमाणे प्रवेशक्षमतावाढीस शैक्षणिक वर्ष २००२-२००३ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

Mr. Prashant In file DTE
File No - 27 B.
26/3/03

C:\My Documents\M.R.Jadhav\orders\University orders 2002-03.doc

5

Sr. & Dt 25-03-03
No. 1494

१. पदवी अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, नागपूर विद्यापीठ , नागपूर यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

३. विना अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच या संचालनालयाकडून करण्यात आलेल्या / येणा-या नियमांचे , प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

( प्रा. न. वा. पासलकर )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

प्रत-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २९ जून २००२ नुसार सादर.
२. कुलगुरु नागपूर विद्यापीठ,नागपूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीसाठी सादर
४. कार्यासन क्रमांक १० व ३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
५. निवड नस्ती.